# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे

## हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कल्याण (प.) (सुभेदारवाडा)

## वार्षिक अहवाल २०२२-२०२३

दिनांक : ०४ जानेवारी २०२३

**प्रमुख पाहुणे : मा. श्री. स्वप्नील नामजोशी**
(इन्शुरन्स आणि म्युच्युअल फंड वितरक-माजी विद्यार्थी)

**समारंभाचे अध्यक्ष : मा. श्री. अभय वसंत बोरकर**
(शालेय समिती अध्यक्ष - ज.ए.इ. चे हायस्कूल व ज्यु. कॉलेज, कल्याण, - माजी विद्यार्थी)

शाळेचे आजी-माजी विद्यार्थी, पारितोषिक ठेवीदार, शाळेचे आजी-माजी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, निमंत्रित शाळेतील गुणवत्ता प्राप्त विद्यार्थी, उपस्थित पालक, बंधू आणि भगिनींनो.

आपल्या समोर वार्षिक अहवाल सादर करताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.

### * कार्यरत व्यवस्थापन *

| | | |
|---|---|---|
| मुख्याध्यापक - प्राचार्य | : | **श्री. एल. एम्. भोये** (बी.ए., बी.एड.) |
| उपमुख्याध्यापिका | : | **श्रीमती आर. बी. पाटील** (बी.एस्सी., बी.एड.) |
| पर्यवेक्षक | : | **श्री. पी. बी. पवार** (बी.एस्सी., बी.एड.) |
| पर्यवेक्षक | : | **श्री. एस्. ई. नलावडे** (बी.ए., बी.एड.) |

### * कार्यरत शालेय समिती *

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | **श्री. अे. व्ही. बोरकर** |
| सदस्य | : | **श्री. आर. डी. भिडे** |
| सदस्य | : | **श्रीमती जी. सी. कोठे** |
| सदस्य | : | **श्री. व्ही. व्ही. पुराणिक** |
| शिक्षक - सदस्य | : | **श्री. एस. ई. नलावडे** |
| शिक्षकेतर - सदस्य | : | **श्रीमती आर. पी. सरदेसाई** |
| सचिव | : | **श्री. एल. एम्. भोये** |

## ❋ बदली / पदोन्नती ❋

❋ **श्री. डी. सी. पाटील** (बी. एस्सी., बी.एड.) यांची उपमुख्याध्यापक म्हणून न्यू हायस्कूल कल्याण येथे पदोन्नती. दि. १ मार्च २०२२.

❋ **श्रीमती पी. पी. माळी** (बी. ए., बी.एड.) यांची उपमुख्याध्यापिका म्हणून न्यू हायस्कूल कल्याण येथे पदोन्नती. दि. १ सप्टेंबर २०२२.

## ❋ सेवा निवृत्ती ❋

❋ आपल्या शाळेतील MCVC विभागातील शिक्षक **श्री. व्ही. एस्. कुलकर्णी** हे ३० सप्टेंबर २०२२ रोजी सेवानिवृत्त झाले.

❋ आपल्या शाळेतील इंग्रजी विषयाचे शिक्षक **श्री. एस्. एच. शेख** हे ३१ जाने. २०२३ रोजी सेवानिवृत्त होत आहेत.

❋ आपल्या शाळेतील सेवक **श्री. एस्. डी. ठाकरे** ३१ मार्च २०२२ रोजी सेवानिवृत्त झालेत.

## ❋ शैक्षणिक ❋

१) इ. १०वी शालांत परीक्षेचा निकाल – ९८.७८%
प्रथम क्रमांक – कु. स्वरा श्रीगणेश अष्टेकर (९६.८०%)

२) इ. १२वी – कला विभाग – निकाल – ८३.५२%
प्रथम क्रमांक – कु. भोईर दिशा अनिल (७८.६६%)

३) इ. १२वी – इलेक्ट्रॉनिक – निकाल – ९१.६७%
इ. १२वी – अकौन्टींग ॲन्ड ऑडिटींग – ६९.५७%

## ❋ शैक्षणिक सहल ❋

इ. ५वी ते इ. ७वी – यशश्री रिसोर्ट व शैक्षणिक उपक्रम अंबाडी, भिवंडी.

## ❋ शासकीय चित्रकला परीक्षा ❋

एलिमेंटरी निकाल – १००%

इंटरमिजिएट – १००%

## ✻ सांस्कृतिक, बहिशालेय स्पर्धा व वाङ:मय मंडळ ✻

- ✻ वाङ:मय मंडळातर्फे विद्यार्थ्यांच्या वाचन, लेखन कौशल्याला प्रोत्साहन देण्यासाठी **'तरंग'** या हस्तलिखीताची निर्मिती.
- ✻ दि. ३० जून २०२२ रोजी महाकवी कालिदास दिन साजरा केला.
- ✻ दि. ०७ जुलै २०२२ रोजी इ. ८वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'कारगिल शौर्यगाथा' या दृकश्राव्य कार्यक्रमाचे आयोजन.
- ✻ दि. ०९ जुलै २०२२ रोजी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' या अभियानांतर्गत इ. ९वी च्या विद्यार्थीनींसाठी स्वसंरक्षणाचे तीन दिवशीय मोफत शिबिर.
- ✻ दि. ३० जुलै २०२२ रोजी – छत्री रंगवा कार्यशाळा व स्पर्धेचे आयोजन.
- ✻ दि. १ ऑगस्ट २०२२ लोकमान्य टिळक पुण्यतिथि निमित्ताने अप्पा बाहेकर हस्ताक्षर, निबंध, वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन.
- ✻ दि. ९ ऑगस्ट २०२२ – क्रांतिदिना निमित्त वर्गात विद्यार्थ्यांनी क्रांतीकारकांच्या कथा, गीते सादर.
- ✻ दि. १२ ऑगस्ट २०२२ इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'सायबर सुरक्षा' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन.
- ✻ दि. १३, १४, १५ ऑगस्ट २०२२ – स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन.
- ✻ दि, २४ ऑगस्ट २०२२ – विद्यार्थ्यांसाठी पर्यावरणपूरक गणेश मूर्ती कार्यशाळाचे आयोजन.
- ✻ दि. ५ सप्टेंबर २०२२ – शिक्षक दिन साजरा
- ✻ दि. २ ऑक्टोबर २०२२ – म. गांधी जयंती साजरी
- ✻ दि. ३ ऑक्टोबर २०२२ – शारदोत्सव निमित्ताने शारदा पूजन.
- ✻ दि. १४ नोव्हेंबर २०२२ – बालदिन व सी. एम. पुराणिक विज्ञान विषयक इ. ५वी ते इ. १०वी च्या विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आल्या.
- ✻ दि. २६ ते २ डिसेंबर २०२२ – संविधान सप्ताह निमित्ताने प्रभात फेरी, पथनाट्य, वक्तृत्व, निबंध, वाचन, प्रबोधन घेण्यात आले.
- ✻ इ. ९वी, व इ. १०वी विद्यार्थ्यांसाठी 'गुंतवणूकीची बालमैफील' परीसंवाद आयोजित करण्यात आला.
- ✻ सार्वजनिक वाचनालय कल्याण तर्फे आयोजित ग्रंथदिंडीत विद्यार्थ्यांचा सहभाग.
- ✻ मनशक्ती केंद्र, कल्याण शाखेतर्फे इ. ८, इ. ९, इ. १०वी विद्यार्थ्यांचे उद्बोधक घेण्यात आले.

## ✲ क्रीडा विभाग ✲

या शैक्षणिक वर्षात जि. प. ठाणे, K.D.M.C. पालिकेतर्फे घेण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा, विभागिय राज्यस्तरीय कबड्डी, खो खो, कुस्ती, तायक्वांदो, मल्लखांब असे १९ क्रीडा प्रकारात २४३ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

इ. १० क मधील कु. ऋतुजा अतुल चिंचनसुरे ह्या विद्यार्थिनीस जुले २०२२ मध्ये जिल्हास्तरीय टेबलटेनिस स्पर्धा, ऐरोली येथे १५ वर्षाखालील गटातून प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे. तसेच डिसेंबर २०२२ मध्ये 'डेरवन राज्यस्तरीय स्पर्धेत' १५ वर्षाखालील गटात सांघिक स्पर्धेत दुसरा क्रमांक प्राप्त झाला आहे.

कु. नवनाथ मनोज सुतार इ. १२वी. (इलेक्ट्रॉनिक्स) ह्या विद्यार्थ्यास 'कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयोजित कुस्ती स्पर्धेत ५७ किलो वजनी गटात प्रथम क्रमांक प्राप्त झाला आहे.

## ✲ बहि:शालेय परीक्षा ✲

डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक, हिंदी, इंग्रजी, गणित विद्यापीठ परीक्षा, NTS, MTS, संस्कृत परीक्षा या सर्व परिक्षांमध्ये विद्यार्थी भाग घेतात व धवधवीत यश प्राप्त करतात.

## ✲ विज्ञान विभाग ✲

- ✲ इ. ९वी विद्यार्थ्यांनी महाराष्ट्र निसर्ग उद्यान मुंबई येथे क्षेत्रभेट दिली.
- ✲ दि. १४ नोव्हेंबर २०२२ रोजी सी. एम. पुराणिक विज्ञान प्रश्न मंजुषा इ. ५वी ते इ. १०वी च्या विद्यार्थ्यां साठी स्पर्धा घेण्यात आली.
- ✲ इ. ५वी ते इ. १०वी साठी शालेय स्तरावर विज्ञान प्रदर्शन आयोजित करण्यात आले.
- ✲ जानेवारी २०२३ मध्ये संस्थेच्या विज्ञान प्रदर्शनात आपल्या शाळेचे विद्यार्थी भाग घेणार आहेत.
- ✲ अमेरिकन इंडिया फाऊंडेशन यांच्या तर्फे आयोजित आंतरशालेय विज्ञान प्रदर्शनात आपल्या शाळेतील इ. ९वी तील कु. स्वानंद सुतार व कु. हर्ष देशमुख यांच्या 'सोलर वॉटर पंप मॉडल'ला तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.

## ✲ निकाल सुधार विभाग ✲

- ✲ इ. १०वी, इ. १२वी साठी आठवडी सराव परीक्षा घेतली जाते.
- ✲ इ. १०वी, इ. १२वी संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारीत सर्व विषयांचा एक संच विद्यार्थ्यां कडून सोडवून घेतला.

* प्रथम सत्र परीक्षेत कमी गुण असलेल्या विद्यार्थ्यांसाठी रोज एक तास विशेष मार्गदर्शन केले जाते.
* लेखन सरावासाठी पुन्हा एक पूर्व परीक्षा घेण्याचा मानस आहे.

## * विशेष उल्लेखनीय *

* दि. २५ जून २०२२ रोजी संस्थेची स्वत:च्या मालकीची अद्‌यावत व सुसज्ज संगणक कक्षाचे उद्‌घाटन समारंभ.
* रोटरी क्लब ऑफ न्यू कल्याण यांच्यातर्फे 'नेशन बिल्डर अॅवार्ड – आदर्श शिक्षक पुरस्कार' आपल्या शाळेच्या उपमुख्याध्यापिका सौ. रंजना पाटील ह्यांना प्राप्त झाला. एकविसाव्या शतकातील कौशल्यासाठी जागतिक नागरिकत्व शिक्षण या विषयाअंतर्गत महाराष्ट्र राज्यातर्फे राज्यस्तरीय सुलभक म्हणून क्षेत्रीय शिक्षा अनुसंधान भोपाळ येथे दोन दिवसीय प्रशिक्षणासाठी सौ. वृषाली फडे मॅडम यांची निवड करण्यात आली.
* आपली शाळा आणि रोटरी क्लब ऑफ सेंट्रल कल्याण यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या शाळेतील इ. ५वी ते इ. ८वी च्या विद्यार्थ्यांची नेत्र तपासणी आणि दंत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.
* दि. ०३ व ४ ऑक्टोबर २०२२ – अध्ययन संस्था मुंबई यांच्यातर्फे आंतरशालेय अपूर्णांक गणित ऑलम्पिक स्पर्धा मध्ये इ. ६, इ. ७ व इ. ८वी च्या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले.

## * पालक शिक्षक संघ *

शाळेत पालक–शिक्षक संघ कार्यरत असून, शाळेच्या विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने निर्णय होतात.

## * भावी योजना *

* ४था मजला पूर्ण करणे.
* इ. ११वी, इ. १२वी विज्ञान शाखा सुरु करणे.

**शाळेवर उदंड प्रेम करणाऱ्या ज्ञात-अज्ञातांचे ऋण निर्देश व्यक्त करुन अहवाल पूर्ण करतो.**

धन्यवाद !

**श्री. एल. एम्. भोये**

मुख्याध्यापक

# जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटचे

हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय, कल्याण (प.) (सुभेदारवाडा)

## * संस्थेचे अद्‌यावत व सुसज्ज संगणक कक्ष *

- ❖ वातानुकूलित संगणक कक्ष
- ❖ अनुभवी आणि उच्चशिक्षित संगणक शिक्षक
- ❖ १४०० चौ. फुटाचा विस्तीर्ण संगणक कक्ष
- ❖ अद्‌यावत ५० संगणक
- ❖ अद्‌यावत तंत्रज्ञानानुसार आखलेले अभ्यासक्रम
- ❖ प्रात्यक्षिक सरावास प्राधान्य

- ❖ या संगणक कक्षात शालेय अभ्यासक्रमासह शिकविले जाणारे व्यावसायिक प्रमाणपत्रित अभ्यासक्रम अत्यल्प शुल्कात
- ❖ Advanced Office
- ❖ Data Science with spreadsheet
- ❖ Web Designing
- ❖ C, C++ programming
- ❖ Advanced Presentation Techniques
- ❖ Computerized Practical Accounting with (GST & E-Way Invoicing)

* संस्थेचे अद्‌यावत व सुसज्ज संगणक कक्ष *

सुभेदारवाडा विद्या संकुल,

गांधी चौक, कल्याण (प.)

संपर्क : ९३२१०२०५४८ / ९९२०१७१२८१